## सदस्य, औद्योगिक न्यायालय, सोलापूर यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्री. प्र. प्र. राजवैद्य)

## तक्रार (अ.का.प्र.) क्र. १७९/२०१८

(CNR NO. MHIC13000326-2018)

श्री.जगन्नाथ मसाजी बनसोडे ... तक्रारदार.

**विरूध्द**

सोलापूर महानगरपालिका व दोन इतर ... सामनेवाले

---

श्री.बी.टी.जाधव, तक्रारदारातर्फे विद्वान वकील.
श्री.कालेकर व श्री.कांबळे, सामनेवालेतर्फे विद्वान वकील.

---

### : निशाणी क्र.सी–१० वर आदेश :

(दिनांकः–२८/०२/२०२३)

१. अर्ज व त्यावर तक्रारदाराच्या वतीने देण्यात आलेला जबाब वाचला. सामनेवालातर्फे श्री.कालेकर वकीलांच्या वतीने विद्वान श्री.कांबळे वकील यांचा तर तक्रारदारातर्फे विद्वान श्री.बी.टी.जाधव वकील यांचा युक्तिवाद मी ऐकला. संपुर्ण संचिकेची मी पाहणी केली.

२. सामनेवालाच्या विद्वान वकीलांनी युक्तिवाद केला की तक्रारदार हा सामनेवालाकडे आयात कर निरिक्षक या पदावर कार्यरत होता व तो कामगार या संज्ञेत येत नाही त्यामुळे प्रस्तुतचा तक्रार अर्ज दाखल करण्याचा अधिकार तक्रारदारास नाही. त्यांनी युक्तिवाद केला की तक्रारदाराविरूध्द खातेनिहाय चौकशी होउन त्याला दि.२६/०९/२०१७ च्या आदेशाने शिक्षा देण्यात आली ज्यानंतर त्याने दाखल केलेले अपिल व पुनर्विचार अर्ज फेटाळण्यात आले ज्यानंतर तक्रारदाराने प्रस्तुतची तक्रार दाखल केली आहे जी मुदतीने बाधीत आहे व कायद्याने चालु शकत नाही. त्यांनी युक्तिवाद केला की त्या बाबी कैफियतमध्ये नमुद करावयाच्या राहुन गेल्या आहेत व त्यामुळे त्या संदर्भात कैफियतमध्ये दुरूस्ती करणे गरजेचे आहे. त्यांनी युक्तिवाद केला की मागणी केलेली दुरूस्ती करण्याची परवानगी दिल्यास तक्रारदाराचे कुठलेही नुकसान होणार नाही.

३. याउलट तक्रारदाराच्या विद्वान वकीलांनी युक्तिवाद केला की प्रस्तुतच्या दुरूस्ती अर्जात करण्यात आलेली विधाने चुकीची आहेत व केवळ वेळ काढुपणाचे उद्देशाने प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. त्यांनी युक्तीवाद केला की, दाखल करण्यात आलेल्या दस्तऐवजामध्ये तक्रारदाराचा हुददा वरिष्ठ लिपिक असा दाखविण्यात आला आहे व त्यामुळे तक्रारदार हा कामगार या संज्ञेत मोडत नाही असा सामनेवाला घेवू पाहत असलेला आक्षेप स्विकारार्ह नाही. त्यांनी युक्तीवाद केला की, तक्रारदाराने सामनेवालाकडे अपिल दाखल केले होते व त्यानंतर फेर चौकशी अर्ज दाखल केला होता ज्यामधील निर्णयानंतर प्रस्तुतचा तक्रार अर्ज ९० दिवसांचे आत दाखल केलेला असल्याने मुदतीत आहे व त्यामुळे त्या संदर्भात सामनेवाला घेवू इच्छित असलेला आक्षेप देखील स्विकारार्ह नाही व म्हणून प्रस्तुतचा दुरूस्ती अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.

४. तक्रारदार हा आयात कर निरीक्षक पदावर होता व त्यामुळे तो कामगार होवू शकत नाही तसेच तक्रारदारास खातेनिहाय चौकशीअंती देण्यात आलेल्या शिक्षेनंतर विलंबाने तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे अशा स्वरुपाची दुरुस्ती कैफीयतमध्ये करण्याची परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज देण्यात आला आहे. तक्रारदार हा सामनेवालाचा कामगार होता अथवा नाही ही बाब तसेच प्रस्तुतचा तक्रार अर्ज मुदतीत आहे अथवा नाही ही बाब दोन्ही पक्षांना पुरावे देण्याची संधी देवून निकाली काढावी लागणार आहे. सामनेवालास अर्जात मागणी केल्याप्रमाणे कैफीयत दुरुस्तीची परवानगी दिली म्हणजे सामनेवालाने दुरुस्तीमध्ये सुचवलेला मजकूर सिध्द केल्याचे स्विकारले असे म्हणता येणार नाही व त्यामुळे प्रकरणात पुरावे नोंदणीचे काम अद्याप पूर्ण व्हावयाचे असल्याने सामनेवालाने अर्जात विनंती केल्याप्रमाणे कैफीयत दुरुस्तीची परवानगी दिल्यास तक्रारदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही असे या न्यायालयाचे मत आहे.

५. सामनेवालाने दि.२०/०२/२०१९ रोजी सी.४ वर कैफियत दाखल केली आहे त्यानंतर दि.२४/०१/२०२३ रोजी सामनेवालाने कैफियतमध्ये दुरूस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे त्यावरुन ही बाब स्पष्ट आहे की, प्रस्तुतचा अर्ज कैफीयत दाखल केल्यावर ३ वर्षे उलटून गेल्यानंतर देण्यात आला आहे. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास विलंब का लागला याचा काहीही एक उल्लेख अर्जात उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. वर नमूद केल्याप्रमाणे सामनेवालास कैफीयतमध्ये दुरुस्तीची परवानगी दिल्यास त्याने तक्रारदाराचे कुठलेही नुकसान होणार नाही मात्र कैफीयत दाखल केल्यानंतर ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटून गेल्यावर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्याने अर्ज मंजूर करतेवेळी सामनेवालावर योग्य तो खर्च लावणे गरजेचे आहे असे या न्यायालयाचे मत आहे. सबब वरील सर्व कारणासाठी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## **<u>आदेश</u>**

सामनेवालावर रु.५००/— (पाचशे रुपये फक्त) इतका खर्च लावून अर्ज नि.क्रं.सी—१० मंजूर करण्यात येत आहे.

सामनेवालाने वर नमूद केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम तक्रारदारास प्रत्यक्ष देवून अथवा या न्यायालयात जमा करुन पुढील तारखेस अथवा त्यापूर्वी कैफीयतमध्ये दुरुस्ती करावी.

PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Digitally signed by PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Date: 2023.02.28 15:37:31 +0530

दि.२८/०२/२०२३.

( प्र. प्र. राजवैद्य )
सदस्य, औद्योगिक न्यायालय,
सोलापूर.